**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युअल मॅक्राँ यांची उद्या मुंबईत भेट

- २०२५-२६ च्या हंगामात फेब्रुवारीपर्यंत एकूण २ लाख १ हजार ५४७ टन साखर निर्यात

- गोव्याच्या आरपोरा नाईटक्लबमधे लागलेल्या आगीच्या दुर्घटनेत पीडितांना नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी गोवा सरकारची असल्याचा निर्वाळा

**आणि**

- कुख्यात गुन्हेगार अबू सालेमची मुदतपूर्व सुटकेसाठीची याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या मुंबईत येणार आहेत. फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युअल मॅक्राँ आजपासून ३ दिवस भारत दौऱ्यावर येत असून दोन्ही नेत्यांची उद्या मुंबईत लोकभवन इथं भेट होणार आहे. उभय देशातल्या धोरणात्मक भागीदारीचा आढावा ते यावेळी घेतील. त्यानंतर ते भारत फ्रान्स नवेन्मेष वर्ष २०२६ या कार्यक्रमाचं उद्घाटन संयुक्तपणे करतील. दोन्ही देशातले मोठे व्यावसायिक, उद्योगपती, संशोधक, आणि नवोन्मेषकर्मी या कार्यक्रमात भाग घेणार आहेत. मॅक्राँ यांची ही चौथी भारत भेट असून मुंबईला ते प्रथमच भेट देणार आहेत. नवी दिल्लीत आयोजित एआय इम्पॅक्ट परिषदेचं आमंत्रण मोदी यांनी मॅक्राँ यांना दिलं आहे.

**<><><><><>**

कलम ३७० हटवल्यानंतर जम्मू काश्मीर, ईशान्येकडची राज्यं आणि नक्षलग्रस्त भागातल्या हिंसाचारात ८० टक्के घट झाल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. हे प्रदेश लवकरच हिंसामुक्त होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ते आज नवी दिल्ली इथं दिल्ली पोलीस दलाच्या ७९ व्या स्थापना दिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

**- होल्ड बाईट शहा - -**

**<><><><><>**

२०२५-२६ च्या हंगामात फेब्रुवारी महिन्यापर्यंत भारतानं एकूण २ लाख १ हजार ५४७ टन साखर निर्यात केली असून, यापैकी सर्वात जास्त निर्यात संयुक्त अरब अमिरातींमध्ये झाल्याचं अखिल भारतीय साखर व्यापार संघटनेनं जारी केलेल्या आकडेवारीत म्हटलं आहे. केंद्र सरकारनं २०२५-२६ या विपणन हंगामासाठी एकूण २० लाख टन साखर निर्यातीला मान्यता दिली असून, यात नुकत्याच मंजूर झालेल्या अतिरिक्त ५ लाख टनांचा समावेश आहे. यंदाच्या हंगामात युएई खालोखाल, अफगाणिस्तान, जिबुती आणि भूतान या देशांना सर्वाधिक साखर निर्यात झाल्याचं यात म्हटलं आहे.

येत्या सप्टेंबरमध्ये संपत असलेल्या २०२५-२६ च्या विपणन हंगामात इथेनॉलसाठी होणारा वापर वगळता, भारताच्या साखर उत्पादनात १३ टक्के वाढ होईल, आणि ते २ कोटी ९६ लाख टन वर पोहोचेल, असा अंदाज यात वर्तवला आहे.

<><><><><>

नवी दिल्ली इथं आजपासून इंडिया-AI इम्पॅक्ट समिट २०२६ सुरु होत आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेवरची जागतिक परिषद प्रथमच विकसनशील देशात होत आहे. या परिषदेत सहभागी होण्यासाठी शंभर पेक्षा जास्त देशांना आमंत्रित करण्यात आलं असून, दोन लाखांपेक्षा जास्त लोकांनी ऑनलाइन नोंदणी केली आहे, तर २० पेक्षा जास्त देशांचे नेते आणि ४५ पेक्षा जास्त देशांची मंत्रिस्तरीय शिष्टमंडळं परिषदेत सहभागी होणार आहेत. परिषदेच्या पार्श्वभूमीवर आयोजित होत असलेल्या चर्चासत्रांमध्ये संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस आणि अनेक आंतरराष्ट्रीय संघटनांचे अधिकारी सहभागी होतील.

<><><><><>

भारताकडे कृत्रिम बुद्धिमत्तेचं कौशल्य आत्मसात करण्याची सर्वोत्तम क्षमता असून, नवोन्मेषाला वाव देण्यासाठी भारताने अतिरेकी नियमन टाळण्याचं धोरण स्वीकारलं आहे, असं केंद्रीय मंत्री जितीन प्रसाद यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्ली इथं ए-आय इम्पॅक्ट परिषदेतल्या चर्चासत्रात बोलत होते. जागतिक ए-आय क्षेत्रामध्ये योगदान देण्यासाठी भारताकडे वेग आणि व्याप्ती हे घटक असल्याचं ते यावेळी म्हणाले.

या परिषदेत आज दुपारी राष्ट्रीय महिला आयोग, आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघटना आणि संयुक्त राष्ट्र प्रशिक्षण आणि संशोधन संस्था यांनी संयुक्तपणे एक विशेष सत्र आयोजित

केलं आहे. यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातल्या संधी, कौशल्यविकास, डिजिटल उद्योजकता आणि आर्थिक स्वावलंबन या मुद्द्यांवर विशेष भर दिला जाईल.

<><><><><>

घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित चलनफुगवट्याचा दर जानेवारी २०२६मधे १ पूर्णांक ८१ शतांश टक्के राहिला. अन्नपदार्थ, इतर वस्तू, आणि कारखान्यात तयार होणारी इतर उत्पादनं यांच्या दरात वाढ झाल्यानं हा परिणाम झाला आहे. डिसेंबर २०२५ मधे हा दर ८३ शतांश टक्के होता, तर गेल्या वर्षीच्या जानेवारी महिन्यात तो २ पूर्णांक ५१ शतांश टक्के होता. केंद्रीय उद्योग मंत्रालयाने ही माहिती दिली आहे. जानेवारीत किरकोळ किंमतीवर आधारित चलनफुगवट्याचा दर वाढून पावणेतीन टक्के झाला आहे.

<><><><><>

गोव्याच्या आरपोरा नाईटक्लब आग प्रकरणातल्या पीडितांना नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी गोवा सरकारची असल्याचा निर्वाळा मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा पीठानं दिला आहे. या दुर्घटनेत कामगारांच्या मूलभूत हक्कांचं हनन झाल्याचं न्यायमूर्ती सुमन श्याम आणि न्यायमूर्ती अमित जामसंडेकर यांच्या खंडपीठानं म्हटलं आहे. गेल्या डिसेंबरमधे आरपोरातल्या बर्च बाय रोमियो लेन या नाईटक्लबमधे आग लागून २५ जणांचा मृत्यू झाला. त्यासंदर्भात दाखल जनहित याचिकेवर आज उच्च न्यायालयानं हा निर्णय दिला.

<><><><><>

प्रार्थनास्थळांवर महिलांबाबत भेदभाव होत असल्यासंदर्भात दाखल याचिकांची सुनावणी ९ न्यायाधीशांच्या संविधान पीठासमोर येत्या ७ एप्रिल पासून सुरु होईल, असं सर्वोच्च न्यायालयानं आज सांगितलं. केरळमधल्या शबरीमाला मंदिरात महिलांना प्रवेश देण्याच्या निर्णयाविरोधातल्या पुनर्विचार याचिकेचाही यात समावेश आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती विपुल एम. पांचोली यांच्या पीठानं हा निर्णय दिला. ही सुनावणी २२ एप्रिलला संपेल. सर्व याचिकाकर्त्यांनी १४ मार्चपर्यंत आपापलं म्हणणं सादर करावं, असं न्यायालयानं सांगितलं आहे.

शबरीमाला प्रकरणी पुनर्विचार याचिकेवर ७ ते ९ एप्रिल दरम्यान सुनावणी होईल, या याचिकेला विरोध करणाऱ्या याचिकांवर १४ ते १६ एप्रिल दरम्यान सुनावणी होईल, त्यावर

काही हरकती असतील तर २१ एप्रिलला सुनावणी होऊन २२ एप्रिल रोजी अतिम निर्णय दिला जाईल.

केरळमधल्या शबरीमाला मंदिरात महिलांना प्रवेश देण्याच्या निर्णयाचा पुनर्विचार करण्याची मागणी करणाऱ्या याचिकांना केंद्र सरकारचा पाठिंबा असल्याचं सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी यावेळी न्यायालयाला सांगितलं.

<><><><>

भारत आणि पोर्तुगीज सरकारमध्ये झालेल्या प्रत्यार्पण करारानुसार मुदतपूर्व सुटका मिळावी यासाठी कुख्यात दहशतवादी अबु सालेम याने दाखल केलेला अर्ज आज सर्वोच्च न्यायालयानं फेटाळून लावला. १९९३च्या मुंबई बॉम्बस्फोट प्रकरणात सालेम याला टाडा कायद्यांतर्गत दोषी ठरवण्यात आलं आहे. तुरुंगात चांगल्या वर्तणुकीबद्दल २५ वर्ष कैदेतून सूट मिळावी, अशी विनंती करणारा अर्ज सालेमनं दाखल केला होता. हा अर्ज मंजूर झाला तर तो मुदतपूर्व सुटकेसाठी पात्र ठरेल.

पोर्तुगीज सरकारबरोबर झालेल्या प्रत्यार्पण करारात २५ वर्षांचा तुरुंगवास पूर्ण झाल्यानंतर सालेम याची सुटका करावी लागेल, असं नमूद होतं. सालेम गेली २५ वर्षं कोठडीत असल्याचा युक्तिवाद त्याच्या वकिलांनी केला. मात्र, सालेम याच्या कोठडीची २५ वर्षं पूर्ण झालेली नाहीत, असा युक्तिवाद सरकारतर्फे न्यायालयात करण्यात आला. न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि संदीप मेहता यांच्या पीठाने सालेम याची मुदतपूर्व सुटकेचा अर्ज फेटाळला मात्र त्याला उच्च न्यायालयात दाद मागता येईल असं स्पष्ट केलं.

<><><><>

सोलापूर शहरात आज पहाटे एका स्कूटरला एका वाहनानं धडक देऊन झालेल्या अपघातात ३ जण मृत्युमुखी पडले. पोलिसांनी या अपघाताची नोंद केली असून, चौकशी सुरु असल्याचं आमच्या वार्ताहरानं सांगितलं.

<><><><>

भंडारा जिल्ह्यात लाखनी तालुक्यातल्या नान्होरी गावात काल बिबट्यानं केलेल्या हल्ल्यात एक युवक  जखमी झाला. वनविभागाच्या पथकानं या बिबट्याला जेरबंद करून जंगलात सोडून दिलं.

<><><><>

भारताच्या पहिल्या मुंबई क्लायमेट वीकची सुरुवात उद्यापासून मुंबईतल्या वांद्रे कुर्ला संकुलात जिओ वर्ल्डमध्ये होणार आहे. तीन दिवस होणाऱ्या या परिषदेसाठी देशाचे दोन अंतराळवीर राकेश शर्मा आणि शुभांशु शुक्ला एकाच मंचावर एकत्र येणार आहेत. क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यांच्या हस्ते या दोन्ही अंतराळवीरांचा सत्कार करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला विविध सामाजिक संस्था, सामाजिक क्षेत्रातले नेते, उद्योग क्षेत्रातले शाश्वतता तज्ज्ञ एकत्रित येणार असून भारत आणि ग्लोबल साऊथसाठी हवामानविषयक उपायांवर चर्चा करणार आहेत.

**<><><><><>**

टी ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज ग्रुप डी मधे युएई विरुद्धचा सामना अफगाणिस्तानने जिंकला आहे. नवी दिल्लीत सुरु झाला आहे. नाणेफेक जिंकून अफगाणिस्तानने प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. २० षटकात ९ बाद १६० धावा करुन युएईने  विजयासाठी ठेवलेलं १६१ धावांचं आव्हान अफगाणिस्तानने १९ षटकं आणि २ चेंडूत पूर्ण केलं.

सी ग्रुप मधे इंग्लंड विरुद्ध इटली हा सामना कोलकात्याच्या ईडन गार्डन मैदानावर सुरु आहे. इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे.

**बी ग्रुपमधे ऑस्ट्रेलियाची लढत श्रीलंकेशी संध्याकाळी ७ वाजता होणार आहे.**

**//<><><><><>//**